# जिल्हा परिषद कोल्हापूर

- आवास योजना – प्रधानमंत्री आवास योजनेत जिल्ह्याला 16656 घरकुले तसेच राज्य पुरस्कृत रमाई ,शबरी , ,पारधी आदिम, अटल बांधकाम कामगार आवास योजना, मोदी आवास योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आवास योजनेमधून तसेच यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत 35513 घरकूल मंजूर असून त्यापैकी 27951 घरकूले पूर्ण झाली आहेत, तसेच 7562 घरकूले प्रगतीपथावर आहेत.

- **उमेद अभियानांतर्गत** आज अखेर 27467 इतके स्वयंसहायता समूह स्थापन करण्यात आलेले आहेत. सन 2023-24 मध्ये 11,638 गटांना रक्कम रुपये 391.17 कोटी कर्ज वितरित करण्यात आलेले आहे. तसेच प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न उन्नयन प्रक्रिया उद्योग योजना अंतर्गत 237 महिलांना 87.67 लक्ष इतके रक्कम कर्ज स्वरूपात वितरति करण्यात आले आहे.

- **राष्ट्रीय ग्रामीण आर्थिक परिवर्तन (NRETP)** या केंद्र व राज्य शासनाच्या प्रकल्पांतर्गत कोल्हापूर जिल्ह्यासाठी कोल्हापूरी चप्पल क्लस्टर दि. 18-10-2022 रोजी रु. 340.85 लक्ष निधीस मंजुरी देणेत आली असून यामध्ये 240 महिला कारागीरांना समाविष्ट करुन रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. राज्यामध्ये हा प्रथमच उपक्रम राबविण्यात येत असून कौशल्य कारागीरांच्या उत्पादनास रास्त भाव मिळेल व उत्पादन युनिट उदयोगामधुन त्यांच्या मालाला जास्त भाव मिळुन त्यांचे उत्पन्नात वाढ होणार आहे.

- 15 ऑगस्ट 2019 रोजी लाल किल्ल्यावरुन पंतप्रधान मा. नरेंद्र मोदीजी यांनी जल जीवन मिशन योजनेची घोषणा केली.

- सदर योजनेचे उद्दिष्ट ग्रामीण भागातील सर्व कुटूंबांना '**हर घर नल से जल**' अंतर्गत कार्यात्मक नळ जोडणीद्वारे दर्जेदार, गुणवत्तापूर्ण व 55 लिटर्स प्रतिदिन प्रति माणसी वर्षभर शाश्वत पाणी पुरवठा करणे आहे.

- सदर योजने अंतर्गत कोल्हापूर जिल्ह्यामध्ये एकूण 1270 योजनांचा रु.1475.00 कोटींचा आराखडा मंजूर असून त्यापैकी 1217 योजनांचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. सदर योजने अंतर्गत सन 2054 च्या लोकसंख्येस 55 लिटर्स प्रति दिन प्रति माणसी प्रमाणे स्वच्छ पाणी पुरवठा होणेसाठी अस्तित्वातील वापरण्यायोग्य उपांगे वगळून नवीन लागणारी वाढीव क्षमतेच्या उपांगाचा समावेश करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीमध्ये 1217 योजनांपैकी 377 योजनांची कामे पूर्ण आहेत.

- जिल्ह्यामध्ये 683789 पैकी 678908 इतक्या कुटूंबांना कार्यात्मक नळ जोडणी देण्यात आली असून ग्रामपंचायतीमार्फत उर्वरीत नळजोडणीचे उद्दिष्ट मार्च 2025 पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

- योजनेच्या वीज बिलाचा भार कमी व्हावा, यासाठी 364 योजनांमध्ये नेट मिटरिंग सोलरचा समावेश करणेत आला आहे.

- सौर दुहेरी पंपावर आधारित 31 योजनांचा आराखड्यात समावेश आहे. त्यापैकी 29 योजना पूर्ण असून 2 योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत.

- जिल्ह्यातील एकूण 3265 शाळा व 3961 अंगणवाड्या असून त्या सर्वांना पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आलेली आहे.

- जिल्ह्यातील सर्व 1192 गावे हागणदारीमुक्त (ODF) झालेली आहेत. स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा 2 अंतर्गत जिल्ह्यातील 988 गावे हागणदारीमुक्त अधिक (ODF+) झालेली आहेत.

- प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन अंतर्गत प्रत्येक तालुक्याकरीता एक युनिट मंजूर करणेत आलेले आहे. सदर प्रकल्पामध्ये तालुक्यातील सर्व प्लॅस्टिक संकलन करुन शास्त्रोक्त पद्धतीने व्यवस्थापन करण्यात येणार आहे.

- **पथदर्शी गोबरधन योजनातंर्गत** जिल्हास्तरीय प्रकल्प ग्रामपंचायत माणगाव ता. हातकणंगले येथे मंजूर असून या प्रकल्पामध्ये ग्रामीण भागातुन जमा होण्याऱ्या कचऱ्यापासुन वीज व सेंद्रीय खत निर्मिती करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे.

- पंचगंगा नदीचे प्रदूषण रोखणे या उपक्रमांतर्गत सन 2023-24 मध्ये नियोजन करुन जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये श्री गणेशमूर्ती व निर्माल्य दानाचा उपक्रम आयोजित करुन घरगुती 279723 व सार्वजनिक 2810 अशा तब्बल 282533 इतक्या श्री गणेश मूर्ती व 1424 ट्रॉली व 214 घंटागाडी इतके निर्माल्य जमा करणेत आले.

- **डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना :-**
  अनुसूचित जाती/नवबौद्ध शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी बदललेल्या परिस्थितीची गरज विचारात घेऊन जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्याच्या दृष्टीकोनातून अर्थसहाय्य देण्याची योजना 5 जानेवारी 2017 च्या शासन निर्णया अन्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना सन 2016/17 पासून राबविण्यात येत आहे.

- **सन** 2023-24 अंतर्गत सदरची योजना राबविण्यासाठी रु. 200.00 लक्ष इतका निधी प्राप्त झालेला आहे. 322 लाभार्थीना प्रशासकीय मंजुरी दिलेली असून त्यासाठीची रक्कम रु. 183.45 लक्ष इतकी आहे. आज अखेर 109 लाभार्थीना रु. 69.03 लक्ष इतके अनुदान अदा केले गेले आहे. अनुदान अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

- **सन** 2024-25 अंतर्गत मंजूर निधी रु. 150.00 लक्ष इतका आहे. 123 बाबींच्या लाभार्थीची महाडीबीटी पोर्टलवरून सोडतद्वारे निवड झालेली असून त्यासाठीची अनुदान रक्कम रु. 76.74 लक्ष इतकी आहे. महाडीबीटी पोर्टलवर लाभार्थी निवड प्रक्रिया सुरु आहे.

- **अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तींचा विकास योजना :-**
  अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजनेअंतर्गत रस्ते, पोहोच रस्ते, गटर्स बांधकाम, समाजमंदिर बांधकाम, नळपाणीपुरवठा, मल-निस्सारण, पेव्हर ब्लॉक बसविणे इत्यादी कामे केली जातात. सन 2023-24 करीता एकूण प्राप्त तरतूद रुपये 38,09,63,000/- इतकी असून त्याअंतर्गत एकूण 563 वस्त्यांच्या निधीस मंजूरी देण्यात आली आहे. सदर कामे माहे मार्च 2025 अखेर पूर्ण करणेची असून, प्रशासकीय मंजुरीची कार्यवाही सुरू आहे.

- **दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगाच्या दारी :-**
  दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगाच्या दारी या अभियानाचा कार्यक्रम दि. 25.08.2024 रोजी मा. श्री. ओमप्रकाश बच्चू कडू (मंत्री दर्जा) यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. सदर अभियानाच्या अनुषंगाने जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांचे विविध कार्यालयाकडून एकूण 877 अर्ज प्राप्त झाले व त्यातून एकूण 702 अर्ज निकाली काढण्यात आले. व त्यातून दिव्यांग बांधवांना विविध योजनांचा लाभ देण्यात आला उदा. रेशन कार्ड, UDID कार्ड, बस सवलत इत्यादी.

- **आतंरजातीय विवाहास प्रोत्साहनपर अनुदान देण्याची योजना :-**
  आंतरजातीय विवाहास प्रोत्साहनपर अनुदान देण्याची योजना या योजनेअंतर्गत सन 2023-24 या आर्थिक वर्षामध्ये प्राप्त तरतूद रु. 159.65 लाख या तरतुदीमधून एकूण 320 लाभार्थ्यांना रु. 50,000/- प्रमाणे लाभ देण्यात आला आहे.

- **राजर्षी शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलावंत यांना मानधन देण्याची योजना :-**
  राजर्षी शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलावंत यांना मानधन देण्याच्या योजनेअंतर्गत सन 2019-20 ते 2023-24 अखेर एकूण 500 कलावंतांची निवड करण्यात आली असून अंतिम निवड यादी मा. सांस्कृतिक कार्यसंचालनालय मुंबई यांना सादर करण्यात आली असून सदर कलावंतांच्या बँक खात्यावर (DBT) द्वारे मानधन अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे. सांस्कृतिक कार्य व पर्यटन विभाग महाराष्ट्र शासन यांचा शासन आदेश दि. 16 मार्च 2024 अन्वये सदरची योजना ही ग्रामपंचायत विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर यांचे कडे वर्ग करण्यात आली आहे.

- **जिल्हा परिषद 20% स्वनिधी :-**
  जिल्हा परिषदेच्या एकूण उत्पन्नाच्या किमान 20 टक्के इतकी रक्कम अनुसूचित जाती, नवबौद्ध, विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी राखून ठेवून सदर रक्कम मागासवर्गीयांच्या वैयक्तिक व सामूहिक लाभांच्या कल्याणकारी योजनांवर खर्च करण्यात येते. सन 2023-24 या आर्थिक वर्षात रक्कम रु. 4,08,67,300/- इतकी तरतूद करणेत आलेली आहे. त्यामधून वैयक्तिक व सामूहिक योजना घेण्यात आलेल्या आहेत. सदर योजना राबविण्याची कार्यवाही सुरू आहे.

- सन 2023-2024 या वर्षामध्ये घेण्यात आलेल्या पुर्व उच्च माध्यमिक (इ.5 वी( व पूर्व  माध्यमिक (इ.8 वी( या शासकिय शिष्यवृत्ती परिक्षेत कोल्हापूर जिल्हा आघाडीवर आहे. सदर शिष्यवृत्ती परिक्षेत कोल्हापूर जिल्ह्यातील इ. 5 वी चे  8 .विद्यार्थी व इ 44वी चे .विद्यार्थी राज्यगुणवत्ता यादी मध्ये झळकले आहेत 39

- सन  24-2023 मध्ये शिक्षण विभाग प्राथमिक यांच्या मार्फत जिल्हा नियोजन समिती जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर यांच्या निधीतून इ  6 .वी ते  .  वी च्या विद्यार्थ्यांना रोबोटिक्सचे अद्ययावत प्रशिक्षण देण्यात आले आहे 8 18767 शाळांमधील 351 कोल्हापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांना सदर प्रशिक्षण देण्यात आले आहे.

- समग्र शिक्षा अभियानामध्ये सन      विद्यार्थ्यांना इस्त्रो येथे अभ्यास दौरा 45   मध्ये राष्ट्रीय अभियानातंर्गत 24-2023 .आयोजित करण्यात आला

- **जिल्ह्यातील** 3218 **दिव्यांग विद्यार्थ्यांना मदतनीस, प्रवास, वाचक व प्रोत्साहन भत्ता डीबीटी च्या माध्यमातून** 1 **कोटी** 15 **लाख** 96 **हजार एवढी रक्कम त्यांचे बँक खातेवर देण्यात आली आहे**.

- राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत 0 ते 18 वर्षे वयोगटातील 6 लाख 21 हजार 373 मुलांची 100 टक्के आरोग्य तपासणी केली. सन 2023-24 मध्ये        आरोग्य तपासणी मध्ये हृदयदोष आढळलेल्या एकूण 161 मुलांची यशस्वीरीत्या शस्त्रक्रिया मोफत करण्यात आली.     यामध्ये 0 ते 2 वर्ष वयोगटातील (नवजात) 126 बालकांची शस्त्रक्रिया झाली. सदरची शस्त्रक्रिया कोकीळाबेन हॉस्पीटल, फोर्टीस हॉस्पीटल, एसआरसीसी हॉस्पीटल मुंबई येथे करण्यात आल्या.  या शस्त्रक्रियासाठी जिल्हा परिषद कोल्हापूरहून बालके व त्यांच्या पालकांसाठी मोफत बस सुविधा उपलब्ध करुन दिल्या.   **सन 2023-24 मध्ये हृदय शस्त्रक्रियेसाठी रक्कम रुपये 3 कोटी इतका** पालकांचा खर्च वाचविता आला.

- राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत   0 ते 2 वर्षे वयोगटातील 12 बालकांची कॉक्लिअर इंम्प्लांट (आंतरकर्ण) शस्त्रक्रिया करणेत आली. यामुळे या बालकांना ऐकू आल्यामुळे बोलताही आले आहे.  **या शस्त्रक्रियेमुळे रक्कम रुपये 1 कोटी 20 लाख पालकांचा खर्च वाचविता आला.**

- राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत 0 ते 18 वर्षे वयोगटातील 3412 मुलांची इतर शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या करणेत आली. या शस्त्रक्रियेमुळे रक्कम रुपये 2 कोटी 50 लाख इतका पालकांचा खर्च वाचविता आला.

- प्रधानमंत्री मातृवंदन योजने अंतर्गत 9584 लाभार्थींना 3 कोटी 92 लाख रकमेचा लाभ लाभार्थींच्या बँक खातेवर देणेत आलेला आहे.

- सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि. 11 सप्टेंबर 2019 अन्वये अनुकंपा नियुक्ती करताना प्रतिवर्षी रिक्त झालेल्या एकूण पदांच्या 20% पदे भरणेस मान्यता आहे. शासन निर्णय दि.22 डिसेंबर 2021 अन्वये अनुकंपा नियुक्तीची 20% भरतीसाठीची मर्यादा दि. 31/12/2024 पर्यंत वाढविली आहे. दि. 1 जानेवारी 2022 ते

31 डिसेंबर 2022 या कालावधीत रिक्त झालेल्या 372 पदांच्या फक्त 20% च्या अनुषंगाने 74 पदे भरणेची कार्यवाही करणेत येणार होती. त्यापैकी 53 उमेदवारांचे दि. 08/03/2023 रोजी आणि 19 उमेदवारांचे दि. 22/08/2023 रोजी असे **एकूण 72 उमेदवारांचे** समक्ष समुपदेशन घेऊन त्यांना गट क व ड पदी नियुक्ती देण्यात आली आहे.

- महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्यावतीने 'लेक लाडकी' ही योजना 1 एप्रिल 2023 रोजी व त्यानंतर जन्माला येणाऱ्या मुलींसाठी सुरू करण्यात आलेली आहे. सदर योजनेअंतर्गत मुलीचा जन्म झाल्यावर रु.5000/-, मुलगी पहिलीत गेल्यावर रु.6000/-, मुलगी सहावीत गेल्यावर रु.7000/-, मुलगी अकरावीत गेल्यावर रु. 8000/- व मुलीला अठरा वर्ष पूर्ण झाल्यावर रु.75,000/- असे एकूण रक्कम रु.1,01,000/- चा लाभ अनुज्ञेय आहे. सन 2023-24 मध्ये 1400 मुलींना प्रति लाभार्थी रु.5000/- प्रमाणे रु.70,00,000/- अनुदान DBT द्वारे वितरीत करण्यात आले आहे.

- **जिल्हा परिषद इमारती व निवासस्थान बांधकामे** या योजनेतून कोल्हापूर जिल्हा परिषद इमारतीवर चौथा मजला बांधणेत आला असून, मा. पालकमंत्री महोदय कोल्हापूर जिल्हा यांचे शुभहस्ते दि. 26.01.2024 रोजी उद्घाटन सोहळा संपन्न झाला आहे. सदरचे कामास रक्कम रू. 710.75 लक्ष खर्च झाला आहे. यामध्ये चौथा मजला बांधकाम, दुसरी लिफ्ट व फर्निचरचे काम पूर्ण झाले असून, सदरच्या मजल्यावर शिक्षण विभाग प्राथमिक, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग व जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन या विभागांच्या कार्यालयांना त्यांच्या आवश्यकतेनुसार जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच चौथ्या मजल्यावर प्रशस्त सभागृह देखील बांधण्यात आले आहे.

- जिल्हा परिषदेच्या आवारामध्ये पदाधिकारी , अधिकारी व कर्मचारी यांच्या उत्तम आरोग्यासाठी अत्याधुनिक जिम्नॅशियम सुरु असुन यामध्ये सातत्य ठेवले आहे.

- जिल्हा परिषद कोल्हापूर अंतर्गत अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी दि **. 04, 05 व 06 फेब्रुवारी** 2024 रोजी क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.